।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

CONVOCATION SECTION
Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.co

जा क्र./दीक्षांत/२०२२–२३/4891 दिनांक : १५.०९.२०२२

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : पदवी आवेदनपत्र स्वीकारणे बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यांत येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा **पंचविसावा दीक्षांत समारंभ** लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील पदवी प्रमाणपत्रासाठी आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत.

पदवी व पदव्युत्तर पदवी आवेदनपत्र स्वीकारण्याचा कालावधी नियमित शुल्कासह **दि.१५ सप्टेंबर २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२ हा निश्चीत करण्यात आलेला आहे.** विलंबशुल्क रु.५०/– सह आवेदनपत्र दाखल करण्याचा कालावधी **दिं १५ ऑक्टोबर २०२२ ते ३१ अक्टोबर २०२२ असा राहील.** त्यानुसार दिनांक **दि.१५ सप्टेंबर २०२२** पासून महाविद्यालय व विद्यापीठ संकूल/उपकेंद्र स्तरावर **फक्त हिवाळी २०२१ व उन्हाळी २०२२ च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचेच पदवी आवेदनपत्र** स्वीकारण्यात यावेत. अशा विद्यार्थ्यांसाठी पदवी आवेदनपत्र online पध्दतीने भरावयाची आहेत. सदरील लिंक विद्यापीठ www.srtmun.ac.in संकेतस्थळावर examination विभागाअंर्तगत Convocation Section मध्ये पण उपलब्ध आहे.

पदवी आवेदनपत्र Online भरुन त्यांची प्रिंट संलग्नित महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबधित महाविद्यालयात व विद्यापीठ संकूलाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबधित विद्यापीठ संकूलात विहित शुल्कासह जमा करावी, आवेदनपत्रावरील विद्यार्थ्याच्या फोटोवर साक्षांकन केलेले व बाजूला एक अपलोड केलेल्याच फोटोची प्रत/कॉपी आवेदनपत्रावर लावावी. फोटो हा पासपोर्ट साईजचा व Photo चा Background हा पांढराच असावा अन्यथा फोटो व्यवस्थित प्रिंट होणार नाही याची विद्यार्थ्यांना माहिति संबधितांनी करुन दयावी. विद्यार्थ्याचे **मराठीत व इंगजीमध्ये अचुक नाव तसेच स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.** पदवी आवेदनपत्र पूर्ण असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र स्विकारावेत. पदवी आवेदन पत्र भरतांना विद्यार्थ्याने **Presentia किंवा Absentia पर्याय निवडल्यानंतर त्याच प्रकारचे शुल्क भरणे आवश्यक आहे. अन्यथा पदवी प्रमाणपत्र प्रलंबित राहील याची नोंद संबधितानी घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील.** महाविद्यालयांनी **सुध्दा पदवी आवेदनपत्र स्विकारतांना सदरील बाबीची खात्री करुनच पदवी आवेदनपत्र शुल्क आकारावे. कमी अधिक झालेल्या शुल्काची जबाबदारी संबधित** महाविद्यालयांची राहील.

हिवाळी **२०२१ परीक्षे पूर्वी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठातील दीक्षांत विभागात येवून** Online पध्दतीने भरेलेले **पदवी आवेदन पत्र विहीत शुल्कासह जमा करावयाचे आहेत. त्यांच्यासाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्र भरण्यासाठीची लिंक सुध्दा वरील प्रमाणेच आहे.**

पदवी आवेदनपत्र स्विकारण्याच्या विहीत मुदतीनंतर जिल्हानिहाय पदवी आवेदनपत्र व शुल्क जमा करण्याची प्रक्रिया ही ०५ दिवसाच्या आत करावयाची आहे. सर्व संलग्नित महाविद्यालयांनी स्विकारलेले पदवी आवेदनपत्र जिल्हानिहाय जमा करणे,जमा शुल्काचा डी.डी.काढणे किंवा आरटीजीएस प्रणाली द्वारे विद्यापीठाकडे जमा करणे व बाबतचे वेळापत्रक लवकरच परीपत्रकाद्वारे कळविण्यात येईल. विद्यापीठ परीसरातील सर्व शैक्षणिक संकुलांनी स्विकारलेले पदवी आवेदनपत्र शुल्क भरण्याच्या अंतिम तारखेनंतर पाच दिवसाच्या आत दीक्षांत विभागात सादर करावेत. सोबत पदवी शुल्काबाबतचे सूचनापत्र सूचना फलकावर लावण्यासाठी जोडले आहे.

तसेच वरीलप्रमाणे पदवी आवेदनपत्र महाविद्यालय/संकूल स्तरावर स्विकारल्यानंतर त्यापैकी पोष्टाने (By Post) व उपस्थित राहून (By Hand) पदवी प्रमाणपत्र स्विकारणारे विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रांचा गठठे अभ्यासक्रम निहाय यादीसह वेगवेगळे सादर करावेत. जेणेकरुन विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र वाटप करणे सोयीचे होईल.

सबब,कृपया वरीलप्रमाणे नोंद घेवुन ही बाब सर्व संबधितांच्या निदर्शनास आणुन द्यावी. ही विनंती.

आपला,

(डॉ. दिगंबर एम. नेटके )
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव :–**

१ मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२ मा.प्र.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३ मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
४ मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुल,प्रस्तुत विद्यापीठ.
५ विभाग प्रमुख सर्व प्रशासकिय विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.
६ मा. संचालक, परभणी,लातूर उपकेंद्र प्रस्तुत विद्यापीठ.
७ प्राचार्य, न्यू मॉडेल,डिग्री कॉलेज,हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ.
८ सिनिअर प्रोग्रामर,प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परीपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.
९ मा. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, आपल्यास्तरावरुन वृत्तपत्रामध्ये याबाबतची प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

## पदवी आवेदनपत्र सादर करणेबाबत विद्यार्थ्यांना सूचना

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पंचविसावा दीक्षांत समारंभ लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. समारंभाचा दिनांक व वेळेबाबत सूचना परीपत्रकाद्वारे व वृत्तपत्रांमधून प्रसिध्द करण्यात येईल.

**हिवाळी २०२१ व उन्हाळी २०२२** मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत पदवी,पदव्युत्तर पदवी ईत्यादी परीक्षांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांची पदवी ही महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रमात उपस्थित राहुन किंवा टपालाने घेणे बाबत स्पष्ट अर्जामध्ये उल्लेख करावा. टपालाने पाठविण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यानंतर पाठविण्यात येतील.

**हिवाळी २०२१ पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी** आपले पदवी आवेदनपत्र online भरुन त्याची प्रिंट घेवून विद्यापीठात येवून पदवी प्रमाणपत्र शुल्क जमा करावे लागेल. त्यांच्यासाठी आवेदन पत्रासोबत **रु.२००** नियमित शुल्क व प्रतिवर्ष विलंबशुल्क **रु.५०/—** प्रमाणे शुल्क विद्यापीठात सादर केल्यानंतर त्यांना या दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात किंवा पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात येतील. (अशा विलंबाने पदवी आवेदनपत्र सादर करणा—या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंबशुल्क मिळून एकूण शुल्क **रु.५००/—** पेक्षा अधिक असणार नाही.)

**०१.आवेदनपत्राची उपलब्धता** : विहीत नमुन्यातील आवेदनपत्र online लिंकवर **दिनांक १५ सप्टेंबर २०२२ पासून** उपलब्ध होतील. सदरील लिंक विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर examination विभागाअंर्तगत Convocation Section मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**०२. पदवी प्रमाणपत्र शुल्क** :

(अ) महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रमात उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.१८०/—** (पदवी प्रमाणपत्र शुल्क—रु.१५०, नोंदणी शुल्क—रु.२० व आवेदनपत्र शुल्क रु १०)

(ब) टपालाने पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.२३०/—** (पदवी प्रमाणपत्र शुल्क—रु.२००,नोंदणी शुल्क—रु.२० व आवेदनपत्र शुल्क रु १०)

(क) प्रस्तुत विद्यापीठाअंर्तगत स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी शुल्क रु.५१०/—( पदवी प्रमाणपत्र शुल्क रु. ५०० व आवेदनपत्र शुल्क रु १०)राहील. टपालाने पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी रु.५६०/—(पदवी प्रमाणपत्र शुल्क रु.५५०, आवेदनपत्र शुल्क रु.१०) राहील.

**०३. आवेदनपत्र दाखल करणे** : आवेदनपत्र (फॉर्म) संबधीत महाविद्यालयात/ संकुलामध्ये दाखल करता येतील.

**०४. आवेदनपत्र दाखल करण्याचा दिनांक : दि १५ सप्टेंबर २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२** पर्यंत विहीत शुल्कासह व **दिं १५ ऑक्टोबर २०२२ ते ३१ अक्टोबर २०२२** विलंब शुल्कासह महाविद्यालय व विद्यापीठ संकुलाच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ संकुलात आवेदनपत्र दाखल करता येतील.

... ३...

टीप :

०१) प्रस्तुत विद्यापीठ संकुलातील विद्यार्थी व पीएच.डी. धारक विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पदवी/पदविका प्रमाणपत्र घेण्यासाठी आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र दीक्षांत समारंभातच घेणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र घेतल्यास **रु.५०/–** विलंब शुल्क आकारण्यात येईल.

०२) महाविद्यालयात पदवी आवेदनपत्र दाखल केलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पदवी/पदविका प्रमाणपत्र घेण्यासाठी आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयस्तरावर संपन्न होणा–या पदवी वितरण कार्यक्रमातच देण्यात येतील.

३) पदवी आवेदनपत्रावर आवश्यक ती पूर्ण माहिती भरलेली असावी. अर्धवट किंवा चूकीच्या पध्दतीने भरलेले आवेदनपत्र रद्द समजले जातील.

४) पदवी आवेदनपत्रावर विहीत ठिकाणी विद्यार्थ्याच्या स्वाक्ष–या असाव्यात तसेच विहीत ठिकाणी फोटो लावून साक्षांकन केलेले असावे. फोटो हा पासपोर्ट साईजचा व **Photo** चा **Background** हा पांढराच असावा अन्यथा फोटो व्यवस्थित प्रिंट होणार नाही (फोटो हा पदवी प्रमाणपत्रावर प्रिंट होणार असल्याने साक्षांकन न करता फोटोची एक कॉपी आवेदन पत्रावर लावावी.)

५) पदवी आवेदनपत्रासोबत संबधीत परीक्षेच्या गुणपत्रिकेच्या सर्व वर्षाच्या साक्षांकीत छायाप्रती जोडलेल्या असाव्यात.

६) बी. फार्मसी च्या पदवी आवेदनपत्रासोबत किमान एक महिना कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे सर्टीफिकेट जोडलेले असावे, (ट्रेनिंग सर्टीफिकेट)

७) गुणवत्ता सुधारणा करणा–या (Improvement) विद्यार्थ्यांच्या पदवी आवेदनपत्रासोबत Improvement केलेल्या व त्यापूर्वीच्या पूर्ण वर्षाच्या गुणपत्रिकेच्या छायांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे तसेच यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले असेल तर ते मुळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही त्यांनी यापूर्वी संबधीत परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र घेतले नाही, असा आवेदनपत्रावर उल्लेख करावा.

८) जे विद्यार्थी वरीलप्रमाणे परीपत्रकानुसार विहीत कालावधीत आवेदनपत्र सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर वर्षभर रु.२००/– शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/– भरुन पदवी प्रमाणपत्र घेता येईल.

९) जे विद्यार्थी हिवाळी २०२१ च्या पूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील दीक्षांत कक्षात रु.२००/– शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/– भरुन पदवी आवेदनपत्र सादर करावीत व पदवी प्रमाणपत्र हस्तगत करावे. (अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंब शुल्क मिळून एकूण शुल्क रु.५००/– पेक्षा अधिक असणार नाही.) हिवाळी २०२१ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाच्या वेळी पदवी प्रमाणपत्र घेता येणार नाही. समारंभानंतर पदवी मिळेल.

१०) महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्या दीक्षांत कक्षात पदवी आवेदनपत्र सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांना शुल्क भरल्याची पावती देण्यात येईल. **ही पावती दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेतांना कार्यालयात जमा करावी लागेल. त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.**

११) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच दीक्षांत समारंभात उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी पदवी आवेदन पत्र सादर केलेले आहे पण अद्यापपर्यंत पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी आपले पदवी प्रमाणपत्र प्रस्तुत विद्यापीठातील दीक्षांत कक्षाच्या काउंटर वरून या दीक्षांत समारंभानंतर स्वत: घेवून जावे. सबब, वरील प्रमाणे नोंद घेवुन कार्यवाही करावी.